# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/05/2023 (मंगळवार) सकाळ


## बॅटरी चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा रिलायन्स टावर घोराड शिवार येथे दिनांक ३०/०४/२०२३ चे ०४.५० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने घोराड शिवारातील जिओ रिलायन्स कंपनी टॉवर के. एल. आय. एम. एस. ई. एन. बी. ९००५ घोराड येथील ४ जियो रिलायन्स कंपनीच्या टॉवरच्या बॅटऱ्या किंमती अंदाजे ७२०००/–रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप श्रीकृष्ण वाघाये, वय ३८ वर्ष, रा. एमआयडीसी रेल्वे गेट जवळ कळमेश्वर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी टिपले मो. क्र. ९९६०७५७१७४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील भंडारबोडी येथे दिनांक २९/०४/२०२३ चे ०३/०० वा. ते १२.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– देवेन्द्र रामचंद्र मडावी, वय ३४ वर्ष, रा. कांन्द्री माईन वार्ड नं ०५ याला भंडारबोडी येथील जिओ कंपनीकडुन एनओसी कॉल आला त्यावर सांगितले कि, साईड क्र. आयडी रामटेक ६००० लो बॅटरी दाखवत आहे. त्यामुळे फिर्यादीने लगेच ०१.३५ वा. भंडारबोडी येथील जिओ कंपनीचे मोबाईल टॉवरचे ठिकाणी जावुन पाहिले तेव्हा भंडारबोडी येथील जिओ कंपनीचे मोबाईल टॉवरचे ओ. डी. सी चे आत लागलेले ०४ बॅटरी पैकी ०३ बॅटरी प्रत्येकी १५०००/–रूपये प्रमाणे असा एकुण ४५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना/९६९ उमेश गाढवे मो. नं. ९८२२६१०८०२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर